**<u>ठळक बातम्या</u>**

- सर्वसामान्य नागरिकांना युपीआयद्वारे केलेल्या व्यवहारासाठी कुठलेही शुल्क द्यावे लागणार नसल्याचं केंद्र सरकारचं स्पष्टीकरण

- ज्ञानाचा फायदा देशाला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं IIT च्या विद्यार्थ्यांना आवाहन

- सायबर सुरक्षा मजबूत करण्याची केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची नागरी सहकारी बँकांना सूचना

आणि

- हिमाचल प्रदेशात रस्ते अपघातात ७ जणांचा मृत्यू

<><><><><>

सर्वसामान्य नागरिकांना युपीआयद्वारे केलेल्या व्यवहारासाठी कुठलेही शुल्क द्यावे लागणार नाही असं स्पष्टीकरण केंद्र सरकारनं दिलं आहे. एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला युपीआयद्वारे पैसे हस्तांतरित केल्यावर कुठलेही शुल्क द्यावे लागणार नाही. तसंच ग्राहकांनीही कुठलीही खरेदी केल्यावर युपीआयद्वारे पैसे दिले तरी त्यांना शुल्क द्यावं लागणार नाही असं अर्थमंत्रालयानं स्पष्ट केलंय. या व्यवहारांसाठी MDR अर्थात Merchant Discount Rate शुल्क लागू झालं तर ते केवळ मर्यादित व्यापाऱ्यांना, ठराविक रकमेच्या पलीकडे आणि मर्यादित प्रमाणात असेल असं ते म्हणाले. UPI ची यंत्रणा दीर्घकाळ शाश्वत रहावी, त्यात तांत्रिक सुधारणा होत रहाव्या आणि संभाव्य धोक्यांपासून ती सुरक्षित असावी यासाठी सरकारनं Payment and Settlement Systems कायदा आणल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रहिताला प्राधान्य देऊन आपल्या ज्ञानाचा फायदा देशाला मिळावा यासाठी प्रयत्न करावेत, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आयआयटी दिल्लीच्या ५७व्या दीक्षांत सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विद्यार्थ्यांची स्वप्न आणि आत्मनिर्भरतेची आस विकसित भारताची पायभरणी करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यशस्वी विद्यार्थ्यांचं त्यांनी अभिनंदन केलं. यशस्वी विद्यार्थ्यांमधे विद्यार्थिनींचं प्रमाण अधिक असतं तर अधिक आनंद झाला असता असं ते म्हणाले....

**- - - होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - - -**

आयआयटी दिल्लीच्या सोनिपत परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक परमप्रज्ञा या उच्च क्षमता प्रसंगणक सुविधेचं उद्घाटन त्यांनी केलं.

केंद्रीय शिक्षम मंत्री प्रल्हाद जोशी, आयआयटी दिल्लीच्या संचालक मंडळाचे सदस्य आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

नागरी सहकारी बँकांनी सायबर आणि डिजिटल सुरक्षा प्रणाली आणखी बळकट करण्याची गरज केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज अधोरेखित केली. मुंबईत सहकार नवक्रांती या कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. नागरी सहकारी बँकांसाठी २४ तास कार्यरत असलेल्या सुरक्षा केंद्राचं उद्घाटन, तसंच राष्ट्रीय नागरी सहकारी वित्तीय आणि विकास महामंडळाच्या नव्या कार्यालय संकुलाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते आज झालं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**- - होल्ड - कॅप्सूल - - -**

*(डिजिटल आर्थिक फसवणुकीच्या घटना देशभरात वाढत असून बँकिंग प्रणाली सुरक्षित ठेवण्यासाठी न्यायसहायक विज्ञानाच्या मदतीची गरज आहे. NUCFDC अर्थात राष्ट्रीय नागरी सहकारी वित्तीय आणि विकास महामंडळ आणि राष्ट्रीय न्यायसहायक विज्ञान विद्यापीठ यांच्यात आज झालेल्या सामंजस्य करारामुळे या कामाला हातभार लागेल, असं केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा म्हणाले.*

*नागरी सहकारी बँकांचा उद्देश नफा कमावणं हा नसून सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करणं हा आहे. भारताला समृद्ध करण्यासाठी भारतीयांना समृद्ध करणं गरजेचं आहे. त्यासाठी फक्त भांडवली बाजार पुरेसा होणार नाही, तर त्याला समांतर, स्वयंरोजगाराची व्यवस्था उभारायला हवी आणि नागरी सहकारी संस्था यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.*

***होल्ड... बाईट- अमित शहा***

*सहकार सीबीएस प्रणालीशी यशस्वीरीत्या जोडल्या गेलेल्या पहिल्या सहा नागरी सहकारी बँकांच्या प्रतिनिधींचा सत्कार यावेळी करण्यात आला. राष्ट्रीय सेवा बंडलअंतर्गत 'कोर बँकिंग सर्व्हिस' आणि संबंधित सेवांचं लोकार्पण यावेळी झालं.. देशातल्या सहकारी संस्थांपैकी ७० टक्के संस्था महाराष्ट्र, गुजरात, गोवा आणि कर्नाटकात आहेत, त्यामुळे NUCFDC चं मुख्यालय दिल्लीतून महाराष्ट्रात हलवण्याची घोषणा शहा यांनी केली. आकाशवाणी बातम्यांसाठी अंकिता आपटे, मुंबई)*

<><><><>

महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणी २०२९च्या सार्वत्रिक निवडणुकीत करण्याच्या दृष्टीनं मतदारसंघांची पुनर्रचना तातडीनं होणं आवश्यक असल्याचं केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. ताज्या जनगणनेवर आधारित ही पुनर्रचना करायची झाल्यास आणि जातनिहाय जनगणना करायची झाल्यास या प्रक्रीयेला वेळ लागेल, आणि महिला आरक्षणाची अंमलबजावणी करायला विलंब होईल, २०३४च्या निवडणुकीपर्यंत तरी ती होणार नाही असं रिजिजू यांनी म्हटलं आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी समाजमाध्यमावर लिहीलेल्या मजकुरावर रिजिजू यांनी ही टिप्पणी केली आहे.

दरम्यान, मतदारसंघ पुनर्रचनेत सरसकट ५० टक्के जागा वाढवण्याच्या प्रस्तावाला शिरोमणी अकाली दलानं पाठिंबा जाहीर केला आहे. चंडीगढ इथं आज झालेल्या ज्येष्ठ नेत्यांच्या बैठकीत हा निर्णय झाल्याचं अध्यक्ष सुखबीरसिंग बादल यांनी सांगितलं.

<><><><>

भारताच्या नवीकरणीय ऊर्जा क्षमतेत गेल्या १२ वर्षात ४०० टक्क्यांनी वाढ झाल्याचं नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. भारताने ३०० गिगावॅट जीवाष्म इंधन विरहित ऊर्जा क्षमतेचा टप्पा ओलांडत स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी केल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

न्याय मिळवण्यासाठी नागरिकांनी न्यायव्यवस्थेपर्यंत पोहचण्याऐवजी न्यायव्यवस्थेनं नागरिकांपर्यंत पोहोचलं पाहिजे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत केले. इंदूर इथं आज राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या पश्चिम विभागीय प्रादेशिक परिषदेच्या

उद्धाटनप्रसंगी ते बोलत होते. ज्या नागरिकांना न्यायव्यवस्थेपर्यंत पोहोचणं शक्य होत नाही, त्यांच्यापर्यंत विधी संस्थांनी पोहोचणं आवश्यक आहे, असंही ते म्हणाले. कायदेविषयक जनजागृती करताना क्लिष्ट कायदेशीर शब्दांचा वापर न करता नागरिकांना परिचित असलेल्या सोप्या भाषेत माहिती दिली पाहिजे,असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

झारखंडमधे परीक्षांमधले गैरप्रकार रोखण्याच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी आज झारखंड सरकारच्या ५ सदस्यीय समितीनं चर्चा केली. या समितीने एनएसयुआय, एसीएस आणि जेसीएम या संघटनांच्या प्रतिनिधींशीदेखील चर्चा केली. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागण्या खऱ्या असून मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याकडे त्या मांडू असं मंत्री संजय प्रसाद यादव म्हणाले.  झारखंड लोकसेवा आयोगाची १४वी परीक्षा आणि ती घेणाऱ्या संस्थेनं घेतलेल्या इतर परीक्षा ताबडतोब रद्द कराव्या अशी या आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. या परीक्षेतल्या गैरप्रकारांची चौकशी सुरु असून १९ जणांना अटक करण्यात आली आहे.

<><><><><>

हिमाचल प्रदेशातल्या चंबा जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात एकूण सात जण ठार झाले तर अकरा प्रवासी जखमी झाले आहेत. एक खाजगी बस बैरागढ इथून चंबाच्या दिशेनं जात असताना घाटात घसरुन पडली.

<><><><><>

केरळ राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसला बंगळुरू-म्हैसूर द्रुतगती मार्गावर आज सकाळी अपघात झाला. या अपघातात दोन जण ठार तर २४ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये बस चालक आणि वाहकाचा समावेश आहे.

<><><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज नवी मुंबईतल्या खारघर इथं 'मेघालय सदन' च्या जमीनचं  हस्तांतरण आणि  भूमिपूजन झालं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी दोन्ही राज्यांमधल्या  ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंधांवरही प्रकाश टाकला.  या कार्यक्रमाला

मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा आणि उपमुख्यमंत्री प्रेस्टोन टिनसोंग हे देखील उपस्थित होते.

<><><><><>

E 20 पेट्रोलमध्ये आर्द्रता आणि क्लोराइड आढळल्याचे दावे दिशाभूल करणारे आहेत, असं पेट्रोलियम कंपन्यांनी स्पष्ट केलं आहे. देशभरातल्या चाचणीनंतर पेट्रोलियम कंपन्यांनी हे स्पष्टीकरण दिलं आहे. तसंच पेट्रोलियम पदार्थांच्या टाक्यांमध्ये पाणी शिरल्याचं आढळून आलं नसल्याची माहिती या कंपन्यांनी दिली आहे.

<><><><><>

पवित्र अमरनाथ गुहेकडे जाणाऱ्या दोन्ही मार्गांची दुरुस्ती करण्यासाठी वार्षिक अमरनाथ यात्रा उद्यापासून स्थगित करण्याची घोषणा प्रशासनानं केली आहे. ‘छडी मुबारक’ पारंपरिक पहलगाम मार्गानं पुढे जाईल आणि २८ ऑगस्ट रोजी यावर्षीच्या अमरनाथ यात्रेची सांगता होईल, असं काश्मीरचे  विभागीय आयुक्त अंशुल गर्ग यांनी सांगितलं.

आतापर्यंत ४ लाख ८० हजारांहून अधिक भाविकांनी अमरनाथ गुहेत दर्शन घेतलं, अशी माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

युगांडाच्या सीमारेषेजवळ असलेल्या काँगोच्या पूर्व भागातल्या एका गावावर इस्लामिक स्टेट ग्रुपशी संबंधित दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात किमान १३ जण ठार झाले.

//<><><><><>//